स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा सारांश

(SYNOPSIS)

'' मराठवाड्यातील पाणी समस्या आणि महाराष्ट्राचे राजकारण ''

संशोधक

प्रा.राजेंद्र श्रीमंतराव इंगळे

जनता कनिष्ठ महाविद्यालय

ता.नायगांव जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ.अजय वसंतराव गव्हाणे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

यशवंत महाविद्यालय, नांदेड

संशोधन केंद्र

यशवंत महाविद्यालय, नांदेड

सन २०१५-२०१६

मराठवाड्यातील पाणी समस्या आणि महाराष्ट्राचे राजकारण

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती, मराठी भाषिकांचे स्वतंत्र्य घटकराज्य म्हणून झाली. विदर्भ आणि मराठवाडा हे प्रदेश प्रशासकीय दृष्ट्या विभक्त होते. महाजन कमिशनने विदर्भाला वेगळे राज्य प्रस्थापित केले होते. परंतु यशवंतराव चव्हाण यांनी अतीशय कुशलतेने विदर्भातील नेत्यांना विश्वासात घेऊन १९५६ च्या राज्यपुनर्रचनेनंतर मराठवाडा, विदर्भ व द्विभाषिक मुंबई महाराष्ट्रात सामिल झाले. मराठी भाषा बोलणारे लोक मुंबई, मध्यप्रदेश व हैदराबाद या तीन राज्यात विखुरलेले होते. २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपुर करार झाला. या करारानुसार मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास व्हावा. या विभागाकडे अधिक लक्ष देण्यात यावे असे ठरले. करारामध्ये विदर्भ, मराठवाड्याचे आर्थिक मागासलेपण लक्षात घेऊन त्या भागाच्या विकासाकरिता विशेष लक्ष पुरविण्यात येईल व तसा अहवाल विधान सभेत सादर करण्यात येईल, उद्योग, शिक्षण इत्यादी क्षेत्रात प्रवेश देतांना त्या त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य व समान संधी उपलब्ध करून देण्यात येईल. नागपूर हे उपराजधानीचे व खंडपीठाचे ठिकाण असेल - मराठवाडा व विदर्भ भागाच्या विकासाकरिता विशेष लक्ष पुरविले जाईल इत्यादी तरतुदी नागपुर करारात होत्या. नागपुर करारातील तरतुदी मराठवाड्याला उद्देशुन आहेत. सर्व शर्तीचे पालन केले जाईल एवढेच नाही तर शक्य असेल तेथे त्याहुनही अधिक झुकते माप मराठवाड्याच्या पदरात टाकले जाईल. असे आश्वासन दिले होते.

'मराठवाडा' हा निझामी राजवटीतील मराठी भाषिकांचा भूप्रदेश आहे. या भूभागावर निझामांनी २२९ वर्षे (१७१९ ते १९४८) राज्य केले. या दरम्यानच्या काळात प्रचंड शोषण केले. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले. परंतु निझाम मीर-उस्मान-अलीखानाने आपल्या संस्थानाचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न केला. भारत सरकारने सप्टेंबर १९४८ 'पोलिस ॲक्शन' करून संस्थानाला भारतीय संघराज्यात सामिल केले. १९४८ ते १९५६ पर्यंत या संस्थानाचे वेगळे अस्तित्व होते भारतीय संघराज्यातील 'ब' दर्जाचे राज्य होते.

१ जुलै १९५६ च्या भाषावार प्रांतरचनेनंतर महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाणांच्या प्रयत्नातून मराठवाडा व विदर्भ महाराष्ट्रात विकासाच्या मुद्यावरून सामिल झाले. १९५६ ते १९६० या चार वर्षात मराठवाड्याने कोणत्याही क्षेत्रात प्रगती केली नाही. चक्रवर्ती समिती, दांडेकर समिती आणि केंद्रशासनाने नेमलेल्या शर्मा समितीच्या अहवालात यासंबंधी स्पष्टपणे नमूद केले. उर्वरीत महाराष्ट्रापेक्षा मराठवाड्यात असलेला साधनसंपत्तीचा अभाव, आधारभूत संरचनेचा अपुरा विकास, दरडोई उत्पन्नाचे अत्यंत कमी प्रमाण, सिंचन क्षेत्रात झालेला अपुरा विकास, औद्योगिकीकरणाची मंद गती, तंत्र व व्यावसायिक शिक्षणाचा अभाव इत्यादी घटक मराठवाड्याच्या मागासलेपणास कारणीभूत ठरले आहेत.

मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी वेगवेगळया पातळीवर प्रयत्न केले गेले. परंतु अपेक्षित यश मिळाले नाही. मराठवाड्याचे लढवय्ये नेतृत्व पद्मभूषण मा.गोविंदभाई श्रॉफ व ख्यातनाम साहित्यिक नरहर कुरुंदकर यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी 'जनता विकास परिषदेची' स्थापना केली. परिषदेच्या कार्यातून मागास भागाच्या विकासासाठी १९९४ मध्ये 'मराठवाडा वैधानिक विकास' मंडळाची स्थापना झाली. वैधानिक विकास मंडळ मराठवाड्याच्या अनेक ज्वलंत प्रश्नावर कार्य करीत असताना दिसते.

महाराष्ट्राच्या प्रमुख विभागांपैकी मराठवाडा हा एक प्रमुख महसूली विभाग आहे. या विभागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती ही निसर्गाच्या लहरी पावसावर व जलसिंचनावर आधारलेली आहे. मराठवाड्याचे भौगोलिक क्षेत्र ६४.८१ लक्ष हेक्टर्स असून लागवडी योग्य क्षेत्र त्याच्या ८८ % म्हणजे ५७.३२ लक्ष हेक्टर्स आहे. वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार मराठवाड्याची लोकसंख्या १.८७ कोटी आहे. लोकसंख्येच्या तुलनेने भौगोलिक लागवडीखालील क्षेत्र कमी दिसून येते.

कोणत्याही भुप्रदेशाच्या विकासात पाण्याला फार महत्त्व आहे. जगातील व भारतीय संस्कृती मुबलक पाण्याच्या नदी खोऱ्यात विकसित झाल्या आहेत. जीवन जगण्यासाठी मूलभूत अत्यावश्यक गरजात वायुनंतर पाण्याचाच क्रम लागतो. आजच्या आधुनिक युगात पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मराठवाड्यात पाण्याची उपलब्धी महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेने कमी आहे. त्याच्या पाठीमागे महाराष्ट्रातील कुटील राजकारण कारणीभूत

आहे. राज्याच्या निर्मितीनंतर नैसर्गिक पाण्याचे विभागवार 'समन्याय्य' पद्धतीने वाटप झाले पाहिजे. परंतु उर्वरित महाराष्ट्र व विदर्भाच्या राजकीय नेत्यांनी विकासाचे राजकारण करीत मराठवाड्याच्या हक्काचे पाणी पळविले, त्यामुळे मराठवाड्याचा जलसिंचनाचा अनुशेष व समस्या वाढीस लागली आहे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असंतुलन दुर करण्यासाठी दांडेकर सत्यशोधक समितीने व अनुशेष आणि निर्देशांक समितीने काढलेल्या आकडेवारीनुसार अंदाजे ५० ते ६० % अनुशेष सिंचन क्षेत्राचा आहे. मराठवाडा अल्प पर्जन्यमान असलेला अवर्षणप्रवण भूभाग म्हणून ओळखला जातो. येथे पावसाची सरासरी ८०० ते ८५० मि.मि. आहे. मराठवाड्यात जो काही पाऊस पडतो, शासनाच्या जलव्यवस्थापन नियोजनाअभावी ३५ ते ४० % पाणी इतर राज्यात वाहून जाते. मराठवाड्यात फक्त ७ ते १५ % पाणी जमिनीत मुरते, ४० ते ५० % पाण्याचे बाष्पीभवन होते. मराठवाड्यातील भूजल पातळी फारच खोलवर गेली आहे.

मराठवाड्यात औद्योगिक क्षेत्र औरंगाबाद शहरात विकसित झाले. तेही जायकवाडी प्रकल्पामुळे. परंतु उद्योगधंद्यातून बाहेर पडलेले दुषीत पाणी नाल्याच्या माध्यमातून नदीत सोडले गेल्यामुळे ते पाणी प्रदूषीत होते. त्यामुळे मानवी आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला दिसतो. मराठवाडा विभागात ५ मोठे प्रकल्प, ७४ मध्यम, ५९३ लघू आणि १०८ उपसासिंचन अशा ७८० योजना पूर्ण झाल्या असल्या तरी त्या हंगामी स्वरुपाच्या आहेत. मराठवाड्यातील ४ मोठे, ४ मध्यम, ४४ लघुसिंचन अशा एकुण ५२ प्रकल्प शासनाच्या उदासीन धोरण व त्या संदर्भात झालेल्या राजकारणाने प्रलंबीत आहेत.

मराठवाड्यात प्रामुख्याने गोदावरी, कृष्णा, तापी या प्रमुख नद्यांचे खोरे आहेत. मराठवाडयाला गोदावरी खोऱ्यातून ९६ % पाणी, कृष्णा खोऱ्यातून ०३ % पाणी तर तापी खोऱ्यातून १ % पाणी मिळायला पाहिजे. परंतु पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील राजकीय नेतृत्वाने वरच्यावर पाणी अडवून घेतले. मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळू शकले नाही.

महाराष्ट्र राज्यात प्रादेशिक सिंचनाचा असमतोल निर्माण होऊन प्रचंड प्रमाणात अनुशेष वाढलेला दिसतो. पुढील आकडेवारीनुसार प्रादेशिक सिंचनाचा असमतोल स्पष्ट होता.

अ)	प. महाराष्ट्र	३३७० अब्ज घनफुट पाणी उपलब्ध
ब)	विदर्भ	९७० अब्ज घनफुट पाणी उपलब्ध
क)	मराठवाडा	३६० अब्ज घनफुट पाणी उपलब्ध

वरील तक्त्यानुसार निर्देशित होते की महाराष्ट्रातील जलसिंचनाचा असमतोल मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. याचे प्रमुख कारण काही प्रदेशांना गुंतवणुक आणि विकास प्रक्रियेत झुकते माप दिलेले दिसते. नागपुर करारानुसार पाणी वाटपाचे हक्क अबाधित राहिले पाहिजेत. राजकीय नेत्यांची आश्वासने आणि कायद्याची बाजू राखली पाहिजे. सध्या मराठवाड्याला त्यांच्या कायदेशीर हक्कांचे समन्याय्यी तत्त्वावर पाणी देण्याच्या बाबतीत शासनाकडून होणारा विलंब, पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचा शासनावर असलेला दबाव, प्रगत भागातील जनतेचा त्याला होत असलेला विरोध, मराठवाड्याच्या पाणी समस्येकडे घेऊन जातो. महाराष्ट्रातील सिंचन क्षमता कागदोपत्रीच दिसते. पश्चिम महाराष्ट्राची जीवनदायी असलेल्या कृष्णा खोऱ्यातील २१ अ.घ.फू. पाणी मराठवाड्याला मिळाले पाहिजे. परंतु याबाबत राजकारण होत असताना दिसले. महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या केळकर समितीच्या शिफारशीही प्रादेशिक असमतोल व अनुशेष याच्याशी संबंधीत आहेत.

संशोधन समस्या :

प्रस्तुत अभ्यासासाठी 'मराठवाड्यातील पाणी समस्या आणि महाराष्ट्रातील राजकारण हा विषय निवडला आहे'. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विविध प्रदेशाचा समतोल विकास हे ध्येय होते. परंतु १९६० नंतर महाराष्ट्रात जे राजकारण झाले, शासकीय योजना राबविल्या गेल्या, त्या प्रादेशिक समतोल विकासाला बगल देणाऱ्या ठरल्या. जलसिंचन धोरण व नागपूर करारानुसार राज्यातील पाण्याचे वाटप 'समन्याय्य' पद्धतीने झाले पाहिजे. परंतु राज्यात पाणी वाटप समन्याय्य पद्धतीला बगल देणारे ठरले. त्यातून महाराष्ट्रात जलसिंचनाचा प्रादेशिक असमतोल निर्माण झालेला दिसतो.

जलाचे प्रमाण उर्वरीत महाराष्ट्राच्या तुलनेने मराठवाडा व विदर्भाला कमी मिळाले आहे. मराठवाड्यातील नद्यावरील अपूर्ण प्रकल्प, अपुरे पर्जन्य, पाणी व्यवस्थापनाबाबत अपुरे प्रयत्न,

प्रशासकीय दिरंगाई, लोकजागृतीचा अभाव आदीमुळे मराठवाड्यातील पाणी समस्येने उग्र स्वरुप धारण केलेले दिसते. 'महाराष्ट्रातील जलसिंचनाचा प्रादेशिक समतोल विकास' हेच समस्येचे उत्तर होय. त्यामुळे पुढील काही वर्षात राज्याने याच धोरणाचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. यासाठी राज्यातील जलसिंचनाच्या प्रादेशिक असमतोलाचे शास्त्रशुध्द अध्ययन होण्याची आवश्यकता आहे. हा प्रश्न केवळ अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून समजून घेणे पुरेसे नसून त्यामागिल विकासाच्या राजकारणाचा शोध घेणे महत्त्वाचे आहे.

संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१) मराठवाड्याचा संक्षिप्त आढावा घेणे.

२) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल विकासाचे स्वरुप स्पष्ट करणे.

३) प्रादेशिक असमतोल आणि महाराष्ट्रातील विकास राजकारण यावर दृष्टिक्षेप टाकणे

४) जलसिंचन संकल्पनेचा अभ्यास करणे.

५) महाराष्ट्रातील जलसिंचनाचे व जलसंवर्धनाचे स्वरुप समजुन घेणे.

६) प्रादेशिक जलसिंचनाचा अनुशेष व त्यासंबंधी शासकीय भूमिकेचा आढावा घेणे.

७) प्रगत महाराष्ट्रात मराठवाड्याच्या मागासलेपणाची कारणमिमांसा करणे.

८) महाराष्ट्रात पाण्यासंदर्भात झालेल्या राजकारणाचा अभ्यास करणे.

९) मराठवाड्यातील लोकप्रतिनिधीने पाणी प्रश्नासंदर्भात घेतलेल्या भूमिकेचे स्वरुप स्पष्ट करणे.

१०) मराठवाड्यातील जलविषयक समस्येचे विश्लेषण करून पाण्याच्या समस्येची जाणीव करून देणे.

११)समन्याय्य पद्धतीने पाण्याचे वाटप होण्यासाठी उपाययोजनांचा शोध घेणे.

१२) पाण्याचे समन्याय्य वाटप व्हावे यासाठी मराठवाड्यात झालेल्या आंदोलनाचा आढावा घेणे.

संशोधन अध्ययनाचे क्षेत्र :

संशोधनाची वरील उद्दीष्टे साध्य करण्यासाठी अध्ययनाचे क्षेत्र संशोधकाने निश्चित केले आहे. 'मराठवाड्यातील पाणी समस्या आणि महाराष्ट्रातील राजकारण' अध्ययनाचे क्षेत्र निवडले आहे. विषयाचे सुक्ष्म, सखोल व शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करुन मराठवाड्याच्या पाणी समस्येकडे लक्ष केंद्रित केले आहे.

संशोधन अध्ययनाची गृहीतकृत्ये :

प्रस्तुत अध्ययनाला दिशा मिळण्यासाठी संशोधकाने खालील गृहीतकृत्ये निश्चित केली आहेत.

१) महाराष्ट्रात प्रादेशिक विकासाबाबत असमतोल दिसून येतो.

२) महाराष्ट्रात पाणी वितरण किंवा वाटप धोरणात विशिष्ट प्रांताला नेहमीच झुकते माप दिले गेले.

३) महाराष्ट्राच्या प्रादेशिक जलसिंचन विकासाबाबतच्या धोरणात निर्धारणकर्त्यांचे राजकारण दिसते.

४) मराठवाड्याच्या जलसिंचन विकासासाठी काही जिल्ह्यात स्थानिक नेतृत्वाची उदासीनता आढळून येते.

५) महाराष्ट्राच्या जलसिंचन धोरण आखणीत विशिष्ट प्रदेशाचे वर्चस्व दिसते.

६) महाराष्ट्रातील जल विकास योजनांच्या अंमलबजावणीत प्रशासकीय उदासीनता व काही गंभिर त्रुटी दिसतात.

७) मागास प्रदेशातील जलसिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी शासनाचे प्रामाणिक प्रयत्न होताना दिसत नाहीत.

८) महाराष्ट्रात जलसिंचनाचा असमतोल दूर करण्यासाठी अनेक योजनांची अंमलबजावणी करूनही प्रत्यक्ष परिस्थितीत काही फरक पडलेला दिसत नाही.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक व अनुभवजन्य पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधकाने राज्याच्या विभागवार विकासाचा आढावा घेऊन त्यांच्या विकासातील

जलसिंचनाचा असमतोल स्पष्ट करणे व त्याअनुषंगाने होणाऱ्या राजकारणाला अधोरेखीत केले आहे. त्यासाठी 'मराठवातील पाणी समस्या आणि महाराष्ट्रातील राजकारण' हा अभ्यासासाठी विषय निवडला आहे. सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात पाणी प्रश्न कळीचा मुद्दा बनला आहे. त्या दृष्टीने कोणते प्रयत्न झाले ? त्यांची दिशा कोणती ? त्यांचे परिणाम व त्या दृष्टीने उभी राहिलेली जनआंदोलने, विकास परिषदेची भूमिका, संघटनात्मक झालेले कार्य यासाठी अनुभवजन्य संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. सदरील संशोधनासाठी उपलब्ध साधन सामग्रीचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यासाठी शासकीय अहवालाचाही विचार केला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रामुख्याने द्वितीय सामग्रीचा आधार घेतलेला आहे. यात महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, द मेगा स्टेट महाराष्ट्र, जनता विकास परिषदेचे अहवाल, वैधानिक विकास महामंडळे, कृषीसंचनालय, पाटबंधारे विकास, महामंडळाचे अहवाल, जलसंपदा विभाग, विधिमंडळाचे अहवाल, लोकराज्य, योजना, परिवर्तनाचा वाटसरू, द युनिक बुलेटीन इत्यादी मासिकांचा आधार घेतला आहे. संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रातील संपादकीय लेख, नकाशे, आलेख, तक्ते यांचा उपयोग प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात आला आहे.

वरील सर्वच स्त्रोतांचा वापर करुन गृहितकृत्यांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच निष्कर्ष, उपाययोजना व शिफारशी सांगितल्या आहेत.

अध्ययनाचे महत्त्व :

देशात महाराष्ट्र प्रगतशील राज्य म्हणून ओळखले जाते. परंतु महाराष्ट्राचा समतोल पद्धतीने विकास झाला नाही. मराठवाडा हा प्रदेश उर्वरित महाराष्ट्र, विदर्भाच्या तुलनेने मागासलेला आहे. मराठवाड्याच्या मागासलेपणाला अनेक घटक कारणीभूत आहेत. परंतु संशोधकांनी पाणी समस्येला अधोरेखीत केले आहे.

१) महाराष्ट्रात समन्याय पद्धतीने पाणी वाटप झाले पाहिजे. याबाबत लोकांमध्ये जलजागृती व जाणीवा निर्माण करणे.

२) महाराष्ट्रात असलेला जलसिंचनाचा अनुशेष कमी करण्यासाठी दिर्घकालीन उपाययोजना करणे. अपूर्ण असलेले प्रकल्प पुर्ण करणे.

३) मराठवाड्यात अल्प प्रमाणात पाऊस पडतो, पावसाचे पडलेले पाणी जमीनीत झिरपले पाहिजे, त्यामुळे भूजल पातळीत वाढ होते.

४) पाण्याची गरज लक्षात घेऊन शासकीय जलयुक्त विविध योजनांची अंमलबजावणी करणे.

५) 'मराठवाड्यात भविष्यकाळाचा वेध घेऊन जलसिंचन वाढविण्यासाठी, जलसंधारण, जलव्यवस्थापन इत्यादी कामाला प्राधान्य देणे.

६) मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळविण्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्था, विकास परिषद, संघटना, प्रभावी नेतृत्व, झालेली जलआंदोलने, न्यायालयीन निर्णय जाणून घेण्याच्या दृष्टीने या अभ्यास विषयाचे महत्त्व आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन समस्येचा अभ्यास करताना संशोधकाने पुढील संशोधन आराखडा तयार केला आहे.

प्रकरण पहिले : प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरण हे परिचयात्मक असून यात संशोधकाने संशोधन समस्येचे स्वरुप समजून घेतले आहे. संशोधन समस्येच्या अध्ययनाचे क्षेत्र, व्याप्ती स्पष्ट करून प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे व गृहीतकृत्ये निश्चित केली आहेत. संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धती व महत्त्व स्पष्ट केले आहे. संशोधनाचा आराखडा तयार केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये निवडलेल्या संशोधन समस्येच्या संशोधनासाठी नवीन दृष्टीची गरज व्यक्त केली आहे.

प्रकरण दुसरे : मराठवाडा : एक दृष्टीक्षेप

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र राज्याच्या विविध प्रादेशिक विभागापैकी 'मराठवाडा' हा एक विभाग आहे. मराठवाड्याची ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी सांगण्याचा प्रयत्न अध्ययन कर्त्याने केला आहे. मराठवाडा हा निझामी राजवटीतील 'मराठी भाषिकांचा प्रदेश' आहे राज्यपुनर्रचनेनंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व प्रशासकीयदृष्ट्या कारभार सुरळीत चालविण्यासाठी मराठवाडा या महसुली विभागाची निर्मिती करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणात मराठवाडा विभागाचे भौगोलिक स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. १७°.३५ ते २०°.४० उत्तर अक्षांश आणि ७४°.४० ते ७८°.१५ पुर्व रेखांशांच्या मध्ये समुद्रसपाटी पासून ३०० ते ९०० मीटर दरम्यान पसरला आहे. हा प्रदेश दक्षिण पठारावरचा एक भाग असून त्याच्या उत्तरेस अजिंठ्याच्या लेण्या व दक्षिणेस बालाघाट डोंगराचा रांगा आहेत. मराठवाड्यात प्रामुख्याने गोदावरी, पैनगंगा, पूर्णा, मांजरा, सिंदफणा, तेरणा, दुधणा, कयाधु, मन्याड व लेंडी या प्रमुख नद्या आहेत. येथे ७०० ते ८०० मि.मि. पाऊस पडतो. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. मराठवाड्यात ८ जिल्हे. ७६ तालुके, ८ लोकसभा व ४६ विधानसभा आहेत. मराठवाडा विभाग पश्चिम महाराष्ट्र व विदर्भाच्या तुलनेने मागासलेला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी मराठवाड्यातील पाणी समस्या आणि महाराष्ट्रातील राजकारण निवडल्यामुळे मराठवाडा : एक दृष्टीक्षेप हे प्रकरण निश्चित केले आहे.

प्रकरण तीसरे : मराठवाडा व महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण

प्रस्तुत प्रकरणात राजकीय विकासप्रक्रीया समजून घेण्यात आली. विकासाच्या बाबतीत उलघडा करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विकासाचे प्रमुख टप्पे सांगून मराठवाडा प्रदेश विकासासाठी झालेली जनआंदोलने, नेते, संघटना व विकास परिषदेची भूमिका यांची चर्चा करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाला शासकीय धोरणांच्या उणिवा लक्षात येण्याच्या दृष्टीने संशोधन महत्त्वपूर्ण आहे.

प्रकरण चौथे : महाराष्ट्र आणि प्रादेशिक असंतुलन

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र राज्यातील विकासाच्या प्रादेशिक असमतोलपणाची चर्चा करण्यात आली आहे. संयुक्त महाराष्ट्रात बिनशर्त सामील झालेल्या मराठवाडा, विदर्भ या प्रदेशाचा विकास उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेने मागास आहे. प्रस्तुत प्रकरणात मागासलेपणाची कारणमीमांसा करण्यात आली. कोणती क्षेत्रे मागासलेली आहेत, ते स्पष्ट करण्यात आली आहेत. त्यांचीही चर्चा करण्यात आली आहे. शासकीय निरनिराळ्या समित्यांच्या सांख्यिकीय माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणात आधारभूत तथ्यांचे संकलन करून संकलित तथ्याच्या विश्लेषणाच्या आधारे महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय विकासाची पातळी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण पाचवे : महाराष्ट्रातील जलसिंचनाचा असमतोल व मराठवाडा

प्रस्तुत संशोधन समस्येचे सुक्ष्म व सखोल अध्ययन करण्यासाठी संशोधकाने विशेष क्षेत्र 'मराठवाड्यातील पाणी समस्या' हा विषय निवडला आहे. महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत जलसिंचनाची भूमिका महत्त्वाची आहे. यात जलसिंचनाची संकल्पना शास्त्रीय भाषेत समजून घेऊन तिच्या स्वरूपाची चर्चा करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून जलसंपत्तीचे 'समन्याय्य' तत्त्वावर वाटप झाले नसल्यामुळे राज्यात जलसिंचनाचा असमतोल निर्माण झालेला दिसतो. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील प्रदेशवार जलसिंचनाच्या स्थितीचा आढावा घेऊन मराठवाड्यातील जलसिंचन विदर्भ व उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत कमी आहे त्यांचे सांख्यीकीय माहितीच्या आधारे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण सहावे : मराठवाड्यातील सिंचन क्षमता आणि अनुशेष

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर प्रादेशिक जलसिंचनाचा असमतोल निर्माण झाला. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भाच्या तुलनेने मराठवाड्यातील सिंचन क्षमता कमी असल्याची कारणमीमांसा करण्यात आली. मराठवाड्यात सिंचन क्षमता कमी का! या पाठीमागे असलेल्या राजकारणाचीही चर्चा करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणात शासनाने मराठवाड्याच्या सिंचन विकास प्रकल्पासाठी खुल्या हाताने निधी उपलब्ध करुन दिला नाही, उर्वरित महाराष्ट्र व विदर्भ हा प्रादेशिक विभाग मराठवाड्याच्या हक्काचे पाणी देण्यास तयार नाही. त्यामुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात जलसिंचनाचा अनुशेष निर्माण झाला, याची चर्चा करण्यात आली आहे.

प्रकरण सातवे : मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्व आणि जलसिंचन

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील जलसिंचन समस्या सोडविण्यासाठी मराठवाड्याला लाभलेल्या नेतृत्वाची चर्चा करण्यात आली आहे. मराठवाड्याचा विकास जलसिंचन योजनेत आहे. हे ओळखून राजकीय नेतृत्त्वाने महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय राहून मिळालेल्या सत्तेचा लाभ उठवत मराठवाड्यातील अनेक प्रकल्प मार्गी लावले. तसेच मराठवाड्याच्या हक्काचे पाणी इतर प्रदेशातून खेचून आणण्यात केलेल्या राजकारणाची सविस्तर चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

प्रकरण आठवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात मागील प्रकरणांचा मागोवा घेऊन अंतिम निष्कर्ष व शिफारशी सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधन समस्येचे अध्ययन करून गृहीतकांशी सहसंबंध पडताळून पाहण्यात आले.

निवडक संदर्भ ग्रंथ सुची :

१) तुकाराम जाधव, संपादक महाराष्ट्र वार्षिकी- २००८- द युनिक अॅकॅडमी, पुणे-२००८

२) भुजंगराव कुलकर्णी, मराठवाड्याचा विकास : अभ्यास व चिंतन, पद्मा प्रकाशन औरंगाबाद - १९९८.

३) इंजि.या.रा. जाधव, मराठवाडा पाणी, सिंचन आणि विकास, मराठवाडा जनता विकास परिषद प्रकाशन, डिसेंबर २०१२.

४) प्रा. भगवान काळे, संपादक, मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना १९८६.

५) सुहास पळशीकर, व नितीन बिरमल, महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे - २००७.

६) भुजंगराव कुलकर्णी, संपादक मराठवाडा २००९, खंड पहिला, संयोजन समिती, मराठवाडा २००९, विकास भवन, डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, औरंगाबाद, जून १९८८.

७) डॉ.सुभाष शिंदे, प्रा.मधुकर धोंडे, महाराष्ट्र सिंचन विकास, महाराष्ट्र संचालनालय, पुणे - २००४.

८) डॉ. वसुधा पुरोहीत, भारतीय अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद - २००८.

९) सुधीर बोधनकर, संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, नागपुर - २००३.

१०) सुखदेव थोरात, बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, सुगाव प्रकाशन, पुणे - २०१०.

११) खुपसे व ठोंबरे, पाणलोट व विकास विस्तार प्रकल्प, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पूणे - २००३.

१२) प्रा.डॉ.अजय गव्हाणे, संसदीय लोकशाहीची आयुधे, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स नांदेड, जून - २०१४.

१३) प्रा.व.म.सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - २००८.

१४) डॉ. व्ही.एल.एरंडे, महाराष्ट्रातील जलसिंचनाचा असमतोल : समस्या व उपाय, हर्षवर्धन पब्लिकेशन प्रा.ली.,बीड, जून - २०१४.

१५) आण्णासाहेब शिंदे, शेती, पाणी नियोजन व धोरणासंबंधी काही प्रश्न, श्रीविद्या प्रकाशन, पुणे - १९८७.

१६) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २०११

१७) जायकवाडी प्रकल्प - सिंहावलोकन - २०१०.

१८) महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल खंड.

१९) ए.बी. सवदी, भूगोल व कृषी - निराली प्रकाशन पुणे-२०१२.

२०) डॉ.दि.मा.मोरे, राष्ट्रवादी मासिक, महाराष्ट्रातील भूजलाचे नियोजन-२०१४

२१) प्रा.राजेंद्र इंगळे, बळवंतराव चव्हाण : ग्रामीण नेतृत्त्व एक अभ्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड-२००४.

२२) Karve Iravati, Maharashtra : Land and It's People, Government of Maharashtra, Bombay, 1975.

२३) Dr. S.R.Kakade, Political Development of Maharashtra a Perspective, Swami Ramanand Teertha Research Institute, Aurangabad, 1999.

२४) V.N. Ingole, unpublished Ph.D. Thesis on Regionalism and Politics in Maharashtra, Marathwada University, Aurangabad, 1992.

२५) Brahme Sulbha, Pore Kumud & Pore S.H., Regional Planning : A Case Study of Maharashtra region, Artha Vijana, March-June, 1975, Vol. XVII.

२६) Patnaik S.C., Economics of Regional development and planning in third world countries, Associated publishing house, New Delhi, 1961.

२७) Bombwal K.R., Regional parties in Indian Politics : An overview, in Varinder Grover (Ed.), Political system in India, Vol. 7th Sociological aspects and foundations of political system, deep and deep publications, New Delhi, 1989.

२८) Maheshwari Shriram, Regionalism in India : Political and Administrative response, in the Indian Journal of Public administration, Vol, XIX, No. 4, October-December 1973.

२९) B.P.S. Bhadouria, Regional economic development, Delhi Annual Publication, 1986.

शासकीय अहवाल, साप्ताहिके, मासिके, नियतकालिके इ.

१) दांडेकर समिती अहवाल, १९८४.

२) मागास विभागाच्या विकासाचा अभ्यास गट अहवाल, १९९३.

३) निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल, १९९७.

४) मानव विकास अहवाल, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२.

५) महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, ऑक्टोबर २०१३.

६) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७) अनुशेष दूर करण्यासाठी : १) २००५-२००६ च्या वार्षिक योजनेत केलेल्या विशेष तरतुदी व २) ३१ मार्च २००५ अखेर झालेली भौतिक प्रगती दर्शविणारी पुस्तिका - परिशिष्ठ १, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

८) वित्तीय वर्ष २०१२-१३ च्या वार्षिक नियोजनासाठी राज्यपाल यांचा आदेश, राजभवन मुंबई, १७ मार्च २०१२.

९) मराठवाडा जनता विकास परिषद- विविध ठराव, अहवाल, स्मरणिका इ.

संशोधक

प्रा.राजेंद्र श्रीमंतराव इंगळे

जनता कनिष्ठ महाविद्यालय

नायगाव, जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.अजय वसंतराव गव्हाणे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

यशवंत महाविद्यालय, नांदेड.